Pune Police

**प्रेस नोट दिनांक १८/१२/२०१७**

**आर्थिक फायदयाकरिता संघटीत पणे वेश्याव्यवसायाचे रॅकेट चालविणाऱ्या टोळी विरूध्द मोक्का कायदयान्वये गुन्हे शाखेची कारवाई**

येरवडा पोलीस स्टेशन अंतर्गत एका पंचतारांकित हॉटेल मध्ये वेश्यावयवसाया चालविला जात असल्या संबधाने सामाजिक सुरक्षा विभागाने दि.१८/०९/२०१७ रोजी छापा कारवाई करून एकुण दोन परदेशी व एक भारतीय अश्या तीन पिडीत मुलींची सुटका केली होती. क्ष्या अनुषंगाने दाखल येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं ७५७/१७ इटपा कायदा कलम ३,४,५ सह भा.द.वि. कलम ३७०,३७० (अ) अन्वये दाखल गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेकडे आहे. तपासा दरम्यान नमुद गुन्हा आरोपीत नामे १) प्रताप अंतरयामी साहु वय २६ रा.मॅपल हॉटेल जवळ, गुरूदक्षिणा सोसायटी उबाळे नगर वाघोली ता.हवेली. जि. पुणे. मुळगाव- चंदापुर ता.चंदापुर परजंग जि.-धेनकाई ओरीसा २) लिपुन अंतरयाती साहु, वय-२३, रा. सदर, ३) अमरेंद्र इश्वरचंद्र साहू, वय-२८, रा. सदर, ४) अजय लोकबहादुर गिरी, वय-२५ रा. सध्या वेंकटेश फ्लोरा, बिल्डींग ए, फेज १, मुंढवा, पुणे , मुळ रा. ओरंग, आसाम, ५) बिंकु टंकबहादुर छेत्री,वय-२६, रा. गिरीबारी आसाम, सध्या रा. सदर, ६) शांती लक्ष्मण गिरी, वय-२५, रा. सदर, ७) रमेश रुद्रबहादुर गिरी, वय-३० , रा. सदर, ८) बाबुराम भीमबहादुर गिरी, वय-१९ रा. सदर इ. यांनी मिळुन सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

यातील आरोपितांनी आर्थिक फायदयाकरीता स्वतःची संघटित टोळी तयार केली असुन त्यामध्ये वेळोवेळी वेगवेगळे सदस्य घेऊन आपला तसेच टोळीचा आर्थिक फायदा होण्यासाठी अनैतिक मानवी व्यापाराकरवी परकीय तसेच भारतातील विविध राज्यातील महिला / मुलींना पैशाचे आमिष दाखवून वेळप्रसंगी जबरदस्तीने / धाकदपटशा करुन त्यांचेकरवी वेश्याव्यवसाय करवून त्याने व त्यांच्या साथीदरांनी करोडो रुपयांचा बेकायदेशीर आर्थिक व्यवहारावरुन दिसून आले आहे. नमुद टोळीविरुध्द अशाप्रकारचे मागील दहा वर्षाचे कालवधीमधील तीन किंवा तीन वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेले एकापेक्षा जास्त गुन्हे दाखल असून सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र मा. सक्षम न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

त्यामुळे स्वताच्या आर्थिक फादयाकरिता संघटीतपुणे वेश्याव्यवसायाचे रॅकेट चालवुन मुली/स्त्रीयांचे शोषन करणाऱ्या टोळीच्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी आदेशीत केले होते.त्यानुसार तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक संजय पाटील यांचे प्रस्तावावरुन सदर गुन्हयांत नमुद आरोपी विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४),चा अंतर्भाव करण्यास श्री प्रदीप देशपांडे पोलीस उप महानिरीक्षक तथा अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे पुणे शहर यांनी दिनांक १६/१२/२०१७ रोजी पुर्व मान्यता दिली आहे.त्यानुसार नमुद गुन्हयांस महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)() ३(२),३(४) चा अंतर्भाव करण्यात आला असुन सदर टोळी विरुध्द नमुद कायदयान्वये कडक करण्यात येत आहे.गुन्हयांचा पुढील तपास श्री संजय निकम ,सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे -२ हे करित आहेत.

स्वताच्या आर्थिक फादयाकरिता संघटीतपणे वेश्याव्यावसायाचे रॅकेट चालविणाऱ्या कल्याणी देशपांडे हिचे टोळी विरुध्द सन २०१६ मध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात आली असुन अशा प्रकारे संघटीतपणे गुन्हे करुन वेश्या व्यवसायाचे रॅकेट चालविणा-या टोळी विरुध्द या कादयान्वये सन २०१७ मधील हि पहिली कारवाई आहे.

सदर कारवाई श्रीमती रश्मी शुक्ला,मा.पोलीस आयुक्त पुणे ,श्री रविंद्र कदम सह पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री प्रदीप देशपांडे मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे,श्री पंकज डहाणे पोलीस उप आयुक्त गुन्हे,श्री संजय निकम सहा पोलीस आयुक्त गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय पाटील, सहा. पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, सहा पोलीस निरीक्षक शितल भालेकर व सामाजिक सुरक्षा विभाग ,गुन्हे शाखेच्या स्टाफने केली आहे.

